# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

## तक्रार क्रमांक : १८७४-अ/२०२१

तक्रारकर्ता, श्रीमती अनामिका अनिलकुमार सिन्हा
ब्लॉक ए-४३३/८६५, ८६६, सुभाष टेकडी
आंबेडकर चौक, उल्हासनगर ४२१ ००४

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक
आदर्श शिक्षण समिती, उल्हासनगर-५
सुशिला सिन्हा हिंदी प्राथमिक शाळा, कैलास कॉलनी, उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ ००५

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक
आदर्श शिक्षण समिती, उल्हासनगर-५
सुशिला सिन्हा हिंदी प्राथमिक शाळा, कैलास कॉलनी, उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ ००५

**तक्रार सुनावणीचा दिनांक : १०/६/२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| २२/२/२०२१ | ----- | ४/५/२०२१ | ७/९/२०२१ |

तक्रारकर्ता यांनी दि.२/१२/२०११ रोजीच्या अर्जान्वये "माहिती दिली नाही " असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक १०/६/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस उभयपक्ष अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.
" *सुशीला सिन्हा शाळेत लिपिक पदावर कार्यरत सौ.अंजु अनिल सिन्हा बाबत माहिती*"

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.७/९/२०२१ रोजी, "*सदर माहिती जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक सुशिला सिन्हा हिंदी प्राथ.शाळा उल्हासनगर-५ यांना अपीलार्थी यांना सदर दिनांकाच्या १५ दिवसाच्या आत विनामुल्य देण्यात यावी.*" असा निर्णय दिलेला आहे.

नस्तीवरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता दिसून आले की, जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, आदर्श शिक्षण समिती, उल्हासनगर-५, सुशिला सिन्हा हिंदी प्राथमिक शाळा यांना आजच्या सुनावणीची सूचना प्राप्त झालेली नाही. प्रस्तुत प्रकरणावर पुढील तारखेस सुनावणी ठेवणे उचित होईल.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

### आदेश

प्रस्तुत प्रकरणाची सुनावणी दि.७/७/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता होईल. याबाबत आयोग कार्यालयाने संबंधितांस सुनावणी सूचना काढावी.

**सही/-**
**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १० जून, २०२५ .

### विवेचन

उपरोक्त आदेशानुसार सदर प्रकरणाची सुनावणी आज आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीस उभयपक्ष अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, आदर्श शिक्षण समिती, उल्हासनगर-५, सुशिला सिन्हा हिंदी प्राथमिक शाळा यांना पाठविलेली सूचना त्यांनी स्विकारण्यास नकार दिल्याने ती परत आलेली आहे. त्यामुळे त्यांना सूचना प्राप्त झालेली आहे. असे समजून त्यांचेविरूध्द कारवाई करण्यात येत आहे.

कागदपत्रांचे अवलोकन करता दिसून येते की, तक्रारकर्ता यांच्या दि.२२/२/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना माहिती प्राप्त न झाल्याने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा प्रशासनाधिकारी, शिक्षण विभाग, उल्हासनगर महानगरपालिका यांनी दि.७/९/२०२१ च्या निर्णयान्वये "सदर माहिती जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक सुशिला सिन्हा हिंदी प्राथ.शाळा उल्हासनगर-५ यांना अपीलार्थी यांना सदर दिनांकाच्या १५ दिवसाच्या आत विनामुल्य देण्यात यावी " असे आदेश केले. तथापि त्या आदेशानंतर सुध्दा माहिती प्राप्त न झाल्याने सदरची तक्रार दाखल झाली आहे.

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, आदर्श शिक्षण समिती, उल्हासनगर-५, सुशिला सिन्हा हिंदी प्राथमिक शाळा यांनी आजच्या सुनावणीची सूचना स्विकारण्यास नकार दिला आहे. त्यामुळे यास त्यांचे असहकार्य असल्याचे दिसून येत आहे.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, आदर्श शिक्षण समिती, उल्हासनगर-५, सुशिला सिन्हा हिंदी प्राथमिक शाळा यांनी तक्रारकर्ता यांना माहिती १५ दिवसात जलद टपालाने नि:शुल्क पुरवावी. जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, आदर्श शिक्षण समिती, उल्हासनगर-५, सुशिला सिन्हा हिंदी प्राथमिक शाळा (दि.२२/२/२०२१ व दि.७/९/२०२१ रोजी कार्यरत असलेले) यांनी तक्रारकर्ता यांच्या दिनांक २२/२/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत तसेच प्रथम अपील आदेशानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रतिदिन रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.९/९/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

**सही/-**
**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २८ जुलै, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, आदर्श शिक्षण समिती, उल्हासनगर-५, सुशिला सिन्हा हिंदी प्राथमिक शाळा (दि.२२/२/२०२१ व दि.७/९/२०२१ रोजी कार्यरत असलेले) --**- यांना प्रत** --

-- प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा प्रशासनाधिकारी,
शिक्षण विभाग, उल्हासनगर महानगरपालिका,
वुडलॅन्ड कॉम्पलेक्स, तिसरा माळा, सी विंग,
रेजेन्सी हॉलसमोर, उल्हासनगर- २ **यांचेमार्फत रवाना.** (प्रशासनाधिकारी यांची सदरची प्रत संबंधित तत्कालिन जन माहिती अधिकारी यांना तात्काळ बजावून पोहोच आयोगास सादर करावी)

**विवेचन**

उपरोक्त आदेशानुसार सदर प्रकरणी आज दिनांक ९/९/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. तसेच तत्कालिन व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.राकेश सिन्हा, मुख्याध्यापक, सुशिला सिन्हा हिंदी प्राथमिक शाळा व त्यांचे प्रतिनिधी ॲड.सतिश नोटाणी उपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

तत्कालिन जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी विनंती केली की, त्यांना खुलासा सादर करण्यासाठी वेळ हवी आहे. त्यांची विनंती मान्य करण्यात येत आहे.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.१०/९/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता होईल. सदर सुनावणीस जन माहिती अधिकारी यांनी उपस्थित राहून खुलासा सादर करावा.

**सही/-**
**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ९ सप्टेंबर, २०२५ .

Comp-३

## विवेचन

उपरोक्त आदेशानुसार सदर प्रकरणी आज दिनांक १०/९/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. तसेच तत्कालिन व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.राकेश सिन्हा, मुख्याध्यापक, सुशिला सिन्हा हिंदी प्राथमिक शाळा उपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

तत्कालिन जन माहिती अधिकारी यांनी हे उपस्थित आहेत. त्यांनी आपले म्हणणे सादर केले असून, ते अभिलेखावर ठेवण्यात आले आहे. सदर प्रकरण आदेशाकरिता बंद करण्यात येत आहे.

**सही/-**
**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १० सप्टेंबर, २०२५ .

## विवेचन

उपरोक्त आदेशानुसार सदर प्रकरण आदेशाकरिता बंद करण्यात आले होते.

जन माहिती अधिकारी श्री.राकेश सिन्हा, मुख्याध्यापक, सुशिला सिन्हा हिंदी प्राथमिक शाळा उल्हासनगर यांनी त्यांचा खुलासा मागील सुनावणीस सादर केला आहे. त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी त्यांना प्रथम अपीलाची प्रत उपलब्ध करून दिली नव्हती तसेच व्दितीय अपीलामध्ये देखील त्यांना अपीलाची प्रत दिली नाही. अशा परिस्थितीत प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी पारित केलेला आदेश हा नैसर्गिक न्याय तत्वाच्या विरूध्द आहे.

त्यांनी खुलाशात पुढे म्हटले की, तक्रारकर्ता हे त्यांचे शाळेमध्ये लिपिक म्हणून कार्यरत असलेल्या श्रीमती अंजु सिन्हा यांच्या मुलगी आहे. श्रीमती अंजु सिन्हा या एकमात्र लिपिक सदर शाळेमध्ये कार्यरत आहेत. सदरचा माहिती अर्ज हा प्रथम अपीलीय प्राधिकारी यांचे कार्यालयात दाखल करण्यात आला होता, तो त्यांनी ५ दिवसात माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम ६ (३) अन्वये आपणाकडे पाठविणे आवश्यक होते. सदरचा अर्ज ५ दिवसात पाठविण्यात न आल्याने तो अवैध ठरला आहे.

तक्रारकर्ता यांनी मागणी केलेली माहिती ही श्रीमती अंजु सिन्हा यांचे ताब्यात होती, त्यामुळे दि.१९/३/२०२१ रोजीच्या पत्रान्वये श्रीमती सिन्हा यांना सदरची माहिती उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. तथापि श्रीमती सिन्हा यांनी सदरची माहिती उपलब्ध करून दिली नाही. मात्र दि.२३/३/२०२१ रोजीच्या पत्रान्वये आपणास खोडसाळ उत्तर दिले. श्रीमती सिन्हा यांनी आपणास प्रथम अपील केलेबद्दल काहीही कळविले नव्हते तसेच प्रथम अपीलाची प्रत देखील आपणास दिली नव्हती. त्यामुळे प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी पारित केलेले आदेश हे चुकीचे आहेत.

तक्रारकर्ता यांनी मागणी केलेली माहिती ही गेल्या ३० वर्षाची माहिती होती व ती सुध्दा श्रीमती अंजु सिन्हा यांच्या मुलीनेच मागितली होती. यामध्ये जन माहिती अधिकारी म्हणून आपणास त्रास देण्याचा उद्देश होता. असे असूनही प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी विनामूल्य माहिती देण्याचे आदेश केलेले आहेत. ३० वर्षाची माहिती द्यावयाची असल्याने ती एक हजार पृष्ठांपेक्षा अधिक होईल याचा झेरॉक्स करण्याचा खर्च कोणी करावा हे देखील आदेशामध्ये स्पष्ट केलेले नाही.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे खुलाशात पुढे असेही म्हटले की, श्रीमती अंजु सिन्हा यांचे कुटूंबातील व्यक्ती यांना श्रीमती अंजु सिन्हा यांचेबद्दल माहिती मागण्यास बंदी घालण्यात यावी अशीही विनंती जन माहिती अधिकारी यांनी केली.

जन माहिती अधिकारी यांचा हा खुलासा पाहता त्यांचे असे म्हणणे आहे की, ज्याच्या बद्दलची माहिती म्हणजे श्रीमती अंजु सिन्हा बद्दल मागितलेली आहे. त्यांचेच ताब्यात ती माहिती आहे त्यांचे सहकार्याशिवाय ती तक्रारकर्तास पुरविणे शक्य नाही.

माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम ५ (४) नुसार जन माहिती अधिकारी यांना माहिती पुरविण्यासाठी ज्यांचे सहकार्य आवश्यक वाटते, अशा व्यक्तींना सहकार्य करणे बंधनकारक आहे. याप्रकरणी जन माहिती अधिकारी यांचे म्हणणेनुसार सदरची माहिती श्रीमती अंजु सिन्हा, लिपिक यांचे ताब्यात आहे व त्यांनी सदरची माहिती जन माहिती अधिकारी यांना उपलब्ध करून दिलेली नाही. ही परिस्थिती पाहता श्रीमती अंजु सिन्हा, लिपिक, सुशिला सिन्हा हिंदी प्राथमिक शाळा उल्हासनगर यांचा खुलासा माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम ५ (५) व २० (१) मधील तरतूदीनुसार मागविणे आवश्यक आहे.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

## आदेश

१. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम ५ (५) अन्वये मानीव जन माहिती अधिकारी श्रीमती अंजु सिन्हा, लिपिक, सुशिला सिन्हा हिंदी प्राथमिक शाळा उल्हासनगर यांनी त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती जन माहिती अधिकारी श्री.राकेश सिन्हा, मुख्याध्यापक, सुशिला सिन्हा हिंदी प्राथमिक शाळा उल्हासनगर यांनी मागणी करून देखील उपलब्ध करून दिली नाही. या चुकीसाठी **मानीव जन माहिती अधिकारी श्रीमती अंजु सिन्हा, लिपिक, सुशिला सिन्हा हिंदी प्राथमिक शाळा उल्हासनगर** यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रतिदिन रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

२. प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.३०/४/२०२६ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १८ मार्च २०२६ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**
श्रीमती अंजु सिन्हा, लिपिक,
सुशिला सिन्हा हिंदी प्राथमिक शाळा, कैलास कॉलनी,
उल्हासनगर-५, जि.ठाणे ४२१ ००५

माहितीचा
अधिकार